# जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

**भूसंपादन समन्वय शाखा**

पत्ता :- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, 'अ' विभाग,सोलापूर
Email- palaqsolapur@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१७-२७३१०२०

****************************************************************************

क्र. २०१७/भूसंपादन/कार्या-१/एस.आर.४२/आर आर-६७२ दिनांक :- ०५ /०६/२०१७

---

प्रति,

**व्यवस्थापक,**
**येरवडा कारागृह मुद्रणालय,**
**पुणे-४११००६**

**विषयः** **भूसंपादन-सोलापूर (एस.आर. १२/२०१६)**
सोलापूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील (दु.सु.) आरक्षण क्र.२/४० "वाहन तळ " क्षेत्र ४३७ चौ.मी. संपादनकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) (भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ चे समकक्ष) खालील अधिसूचना मान्यतेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन खालील प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे प्रयोजनासाठी एका प्रकरणामध्ये समक्रमांकाचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) (भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ चे समकक्ष) ची अधिसूचनेची प्रत सोबत जोडलेली आहे.

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | एस.आर.क्र. | भूसंपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १. | सोलापूर | उत्तर सोलापूर | १२/२०१६ | सोलापूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील (दुसरी सुधारीत) आरक्षण क्र.२/४० "वाहन तळ" क्षेत्र ४३७.०० चौ.मी. भागशः संपादनकामी |

आपणांस विनंती करणेत येते की, सदर अधिसूचना त्वरीत महाराष्ट्र असाधारण राजपत्रात प्रसिध्दी देणेत यावी व प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या राजपत्राच्या दोन प्रती या कार्यालयास पाठवून, दहा प्रती भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांना पाठवाव्यात.

सही XXX
**(राजेन्द्र भोसले)**
**जिल्हाधिकारी सोलापूर**

Recd on
17/06/17

प्रतिलिपीः-

१) **जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर**

२/- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) (भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ चे समकक्ष) ची अधिसूचना तीन प्रतीत यासोबत जोडून पाठविली आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील २ स्थानिक वृत्तपत्रांत सदरचे पत्र मिळाल्यापासून त्वरीत प्रसिध्द करणेत यावी. वृत्तपत्रांचे पाच अंक संबंधित भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांचेकडे पाठवावेत. जाहिरात बिले संबंधित भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांचेकडे पाठवावेत.

२) **जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी (एनआयसी), जिल्हा सोलापूर**

२/- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) (भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ चे समकक्ष) ची अधिसूचना प्रत यासोबत जोडून पाठविली आहे. तरी सदर अधिसूचनेची प्रत सोलापूर जिल्ह्याच्या संकेतस्थळावर त्वरीत अपलोड करुन प्रसिध्द करण्यात यावी.

३) **भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांचेकडे माहितीसाठी.**

२/- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) (भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ चे समकक्ष) ची अधिसूचनेच्या प्रती यासोबत जोडलेल्या आहेत. सोबत विषयांकित मुळ संचिका पाठविणेत येत आहे. मुद्रणालयातून राजपत्राच्या प्रती प्राप्त करुन जरुर तर आपले स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर अधिसूचनेच्या प्रती जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार / नगरपालिका कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व प्रकल्पाच्या बाधीत क्षेत्रातील काही ठळक जागी अधिसूचनेची प्रत प्रसिध्द करणेची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

**जिल्हाधिकारी सोलापूर करिता**

<u>**अधिसूचना**</u>

<u>**जिल्हाधिकारी, यांचेकडून**</u>

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६)**

**क्रमांक :- २०१७/भूसंपादन/कार्या-१/एस.आर.१२/२०१६/आरआर-६७२, दिनांक** ०५ **/०६/२०१७.**

ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेची विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/ सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस/१७०१/२७३५/प्र.क्र.४१०३/युडी-१३, दिनांक २८/१०/२००४ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम (१) अन्वये (यापूढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दिनांक १५/१२/२००४पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमिन (यापुढे "उक्त जमिन" म्हणून संबोधिलेली) उक्त सुधारित योजनेत आरक्षण क्र. २/४०, "वाहनतळ" या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहे. ( यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधिलेला)

आणि ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेने ( यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली ) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (१) अन्वये उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्र.टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दि.३.०३.१९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनी बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (१) (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (२) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम २०१५ च्या नियम ५(दोन) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापूढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्ही सह) ला सूट दिली आहे. सदरचा अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्र.७१, दि.३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिध्द झालेला आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे सदर बाबींद्वारे घोषित करण्यात येत आहे.

D/Slao2014/Joshi/Notification /solapur

A.K. Branch
12 JUN 2017
N.T.
Tah.G.B. R.D.C. Collector

Collector Office
A.K. Branch
15 JUN 2017
N.T.
Tah.G.B. R.D.C. Collector

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दि.२७/०८/२०१४ च्या अधिसूचनेव्दारे केलेले भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ च्या, नियम १७ अनुसार या संपादन प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुस-या व तिस-या अनुसूचिनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (४) सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिका-यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) अन्वये याद्वारे भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे सर्व्हे क्रमांक , संपादनाचे क्षेत्र , जमिनीचे नकाशे , इत्यादी कागदपत्र भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर, डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला, शुभराय आर्ट गॅलरीजवळ, पार्क चौक, सोलापूर-४१३००१ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामाकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**अनुसूची**

सोलापूर महानगरपालिका

**गावाचे नाव- सोलापूर, जिल्हा-सोलापूर.**

| अ.क्र. | संपादन करावयाच्या जागेचे | | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र चौ.मी. | |
| १. | ८८२७ (टि.पी.२ फा.प्लॉ.क्र.३३२) | ४३७.०० | सोलापूर शहाराच्या मंजूर विकास योजना (दु.सु.) मधील आरक्षण क्र.२/४०, “वाहनतळ” (भागशः) संपादनाबाबत. |

दिनांक : ०५ /०६/२०१७.
ठिकाण : सोलापूर.

जिल्हाधिकारी, सोलापूर

D/Slao2014/Joshi/Notification /solapur